**<u>प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र. ०४ ची साक्ष</u>**

**मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**

**<u>पुढील सरतपास प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री.ए.एस.गावडे यांचेमार्फत शपथेवर सरू</u>**

७. मला नि.क्र. ६६/1 वर दाखल असलेले दि. १४/०८/२०१९रोजी तंटामुक्त समिती तिरवडे यांनी पारीत केलेल्या ठराव - जबाबाची प्रमाणित प्रत दाखविण्यात आला. सदर दस्तऐवजावर पोलीस पाटील म्हणून माझी सही आहे. तसेच त्यावर लवू कदम व अंकुश कदम यांची सही आहे. माझे समक्ष त्यांनी सहया केल्याने मी त्यांच्या सहया ओळखतो. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र.६८</u>** देण्यात येते.

८. मला नि.क्र. ६६/२ वर दाखल असलेले दि. २२/०९/२०१९ रोजीचे पावतीची प्रमाणीत प्रत दाखविण्यात आली. लवू कदम यांनी अंकुश कदम यांना चेक व्दारे ३,३३,५००/- रुपये अदा केले बाबतची पावती आहे. सदर पावतीवर माझी सही आहे. तसेच अध्यक्ष प्रकाश यशवंत गावडे, उपसरपंच विकास सत्यवान गावडे व सदस्य जयेंद्रथ बुधाजी परब, लवू कदम व अंकुश कदम यांच्या सहया आहेत. त्यांनी माझे समक्ष सहया केल्याने मी त्यांच्या सहया ओळखतो. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र.६९</u>** देण्यात येते.

सरतपास पुर्ण.

**<u>उलट तपास वादीतर्फे विधिज्ञ श्री. एम.बी.सुकाळी यांचेमार्फत सुरु.</u>**

९. मी मागील २७ वर्षापासून पोलीस पाटील तिरवडे म्हणून कार्यरत आहे. हे म्हणणे खरे आहे की, तंटामुक्ती समितीकडे येणारे तक्रारीचे रजिष्टर ठेवले जाते. हे म्हणणे खरे आहे की, सदर रजिष्टर मी आज माझ्यासोबत आणले नाही. हे म्हणणे खरे नाही की, येणाऱ्या तक्रारींची नोंदवहि आमच्या कार्यालयात नाही. हे म्हणणे खरे नाही की, ज्या मुळ रजिष्टरमधून मी नि.क्र. ६८ व नि.क्र. ६९ हजर केले त्यांचे काही मधील पाने कोरी ठेवलेली आहेत. साक्षीदारानी वादीच्या वकीलांच्या म्हणण्यानुसार मुळ रजिस्टर पडताळणी करण्याकरीता

कोर्टासमोर दिले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मुळ रजिस्टरमध्ये रघुनाथ गणपत गावडे यांच्या अर्जानंतर असलेल्या पान नं. २ च्या मासिक सभा शनिवार दि. २६/१०/२०२४ रोजीच्या सभेच्या उपस्थितीबाबतच्या लेटरहेडवर दिनांक जी पानाच्या उजव्या कोपत्यात लिहिलेली आहे ते तारीख नमूद केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्याच रजिष्टरमध्ये ०३/०१/२०२६ रोजी सभेला उपस्थितीत व्यक्तींच्या सहया आहेत. हे म्हणणे खरे आहे की, त्याच लेटरहेडवरील पुढील पानावर तारीख ०२/१२/२०२५ अशी नमूद असून त्यात गुरुवार दि. १२/०१/२०२६ रोजी उपस्थित राहण्याबाबतचा मजकूर लिहिलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्याच रजिष्टरमध्ये तारीख ०३/०१/२०२६ रोजीची सभेची नोटीस काढण्यात आलेबाबतचा मजकूर नमूद असून सदरची नोटीस कधी काढण्यात आली त्याची तारीख नमूद करण्यात आलेली नाही. हे म्हणणे खरेआहे की, मी आज सादर केलेले कागद हे त्या रजिष्टरच्या शेवटच्या पुठयावर चिकटवलेले आहेत. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, मी आज जे दस्तऐवज सादर केले ते रजिष्टरमधून निखळलेले होते ते इथे तिथे हरवू नये म्हणून मी शेवटच्या पुठयावर चिकटवलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी आज जे दस्तऐवज सादर केले ते रजिष्टरमधून निखळलेले होते ते इथे तिथे हरवू नये म्हणून मी शेवटच्या पुठयावर चिकटवलेले आहेत हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, रजिष्टरच्या पहिल्या पानापासून ते मी आज हजर केलेले दस्तऐवज चिकटवलेले आहेत त्यामधील मधील पाने कोरी आहेत.

१०. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र. ६८ वर दाखल असलेल्या कागदातील मजकूर मला सांगता येणार नाही. नि.क्र. ६८ मध्ये असा मजकूर आहे की, अंकुश रामचंद्र कदम यांनी असा अर्ज केला होता की, आपल्या ठरल्याप्रमाणे अजून पर्यंत अर्धी रक्कम लवू कदम यांनी अदा केली नाही. तसेच रुपये ३,२०,०००/- लवू कदम यांनी अंकुश कदम यांनी द्यायचे होते. उशिर झाल्याने त्यांच्यामध्ये वादविवाद झाले, त्यानंतर ते आमचेकडे आले. अंकुश कदम यांनी असे सांगितले की, मी व्याज घेवून घर बांधलेले आहे मला एवढी रक्कम व्याजाची भरावी लागते. त्यानंतर आम्ही लवू कदम याला नोटीस काढून बोलावून घेतले. लवू याला नोटीस प्राप्त झाल्यानंतर तो हजर राहिला व त्यांनी अंकुश कदम याला ३,३३,५००/- चा धनादेश दिला. असा मजकूर लिहिलेला आहे.

११. मी दाखल केलेल्या नि.क्र. ६९ वर अंकुश कदम याला ३,३३,५००/- चा धनादेश प्राप्त झाला त्याबद्दलची पावती आहे. त्यावर धनादेश प्राप्त झाला म्हणून अंकुश कदम यांची सही आहे. हे म्हणणे खरे नाही की, वर नमूद केल्याप्रमाणे नि.क्र. ६८ व ६९ मध्ये नमूद मजकूर नमूद नाही. माझ्या डाव्या हातावर आकडे लिहिलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, ते आकडे बघून मी उत्तर देत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी पोलीस केसमध्ये साक्ष देतो व पोलीस स्टेशन येथे हजर राहतो. कोर्टात अशी साक्ष द्यायची याचे मला ज्ञान आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दाखल केलेल्या दस्तऐवजावरील सहया ओळखतो हे मी लवू कदम यांच्या सांगण्यावरुन सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, आज मला लवू कदम यांनी साक्ष देण्याकरीता बोलविले आहे. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, मला कोर्टाचे समन्स प्राप्त झाले होते.

१२. हे मला माहित नाही की, अंकुश कदम यांनी तंटामुक्ती समिती, ग्रामपंचायत तिरवडे यांचेविरुध्द गटविकास अधिकारी यांच्याकडे तक्रार केली होती. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. ६८ व ६९ मध्ये लिहिलेला मजकूर मी लिहिलेला नाही. मी नि.क्र. ६८ वर दाखल केलेला ठराव-जबाब आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. ६८ मध्ये कोणते घर बांधायचे आहे त्या घराचा क्रमांक नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. ६८ मध्ये व्याज कधीपासून कधीपर्यंत व किती दराने व्याज आहे हे नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र. ६९ मध्ये नमूद केलेला कथीत धनादेश कोणत्या तारखेचा होता हे नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा चेक हा बेअरर होता की क्रॉस होता हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र. ६८ मध्ये नमूद धनादेश लवू कदम यांनी अंकुश कदम याला न दिल्यामुळे त्या चेकबद्दलची माहिती मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र. ६९ मध्ये नमूद केलेली रक्कम रुपये ३,३३,५००/- हे मी व लवू कदम यांनी अंकुश कदम ला त्रास देण्याकरीता लिहीलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र. ६९ मध्ये नमूद असलेला कागद बनवितावेळेस विकास गावडे, जयेंद्रथ परब, प्रकाश गावडे व मी स्वत: हजर होतो हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, तंटामुक्तीसमितीचे अध्यक्ष, मी व लवू कदम यांनी संगनमताने नि.क्र. ६८ व ६९ वर दाखल केलेले कागद बनावट संगनमताने केलेले आहेत.

१३. हे म्हणणे खरे नाही की, अंकुश कदम यांनी तंटामुक्ती समिती यांच्याकडे कधीही जबाब नोंदविलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, एखादा वाद तंटामुक्तीकडे मिटला नाही तर त्यांना आम्ही कोर्टात जाण्याचा सल्ला देतो. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र. ६८ व ६९ वर असलेल्या सहया खोटया आहेत. मी दाखल केलेल्या सरतपासामधील मजकूर मला सांगता येतील. सदर सरतपासामध्ये किती परिच्छेद आहेत हे मला सांगता येणार नाही परंतु तो मजकूर तीन पानाचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, सरतपासातील मजकूर लवू कदम यांच्या वकीलांनी लिहिला. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, मी त्यावर वाचून सही केली. हे म्हणणे खरे आहे की, मी लवू कदमच्या वकीलांना ओळ ते ओळ काय लिहायचे ते मी सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, कोणता दस्त कोणी दाखल केला आहे त्या बाबतचा मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी दावा वाचून पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, दाव्यातील वादी कोण व प्रतिवादी कोण हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी दाखल केलेला ठराव कधीही पारीत झालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी नि.क्र. ६८ व ६९ वर दाखल केलेला ठराव व जबाब व पावत्या लिहून घेण्याचा अधिकार नाही.

१४. हे म्हणणे खरे नाही की, प्रकाश गावडे व विकास गावडे यांची बरीच प्रकरणे न्यायालयात प्रलंबित आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मला कोर्टात साक्ष देण्याचा अनुभव असल्याने मला पुढे केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, लवू कदम व अंकुश कदम यांचे वडील रामचंद्र कानू कदम हे आहेत. हे मला माहित नाही की, रामचंद्र कानु कदम यांच्या तिरवडे गावात अन्य मिळकती आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीस पाटील असून देखील रामचंद्र कानू कदम यांच्या अन्य मिळकती असल्याचे माहिती नसल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील मजकूर खरा व खोडसाळ आहे. हे म्हणणे खरे नाही की, अंकुश कदम यांनी दि. १४/०८/२०१९ रोजी तंटामुक्ती समितीकडे कोणत्याही प्रकारचा अर्ज दाखल केलेला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, " श्री.अंकुश कदम यांनी श्री लवू कदम यांची संमती घेवून घराचे नुतणीकरण केले व त्याबाबतची निम्मी रक्कम अंकुश कदम व निम्मी रक्कम लवू कदम यांनी देण्याचे कबूल केले, ..................................... ते अंकुश कदम यांच्या देखील

सहया आहेत. या सर्व सहया माझ्यासमक्ष केल्या असल्याने मी त्या सहया ओळखतो," हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/-
एम.के.फकीह
दिवाणी न्यायाधीश क.स्तर मालवण.

दि. २३/०४/२०२६